१

# विरामचिन्हे

संवाद हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संवादाशिवाय माणूस जगूच शकत नाही. आपल्या कृतीतून, हावभावातून, चित्र माध्यमातून, नेत्रपल्लवीतून, लिहिण्यातून, बोलण्यातून अशा अभिव्यक्ती होत असतात. भाषा हे संवादाचे, संपर्काचे उत्तम साधन आहे. भाषेतील अर्थ यादृच्छिक पण परंपरेने रूढ झालेला असतो. निजभाषिकांना तो ज्ञात असतो म्हणूनच बोलणाऱ्याने अभिव्यक्त केलेला आशय ऐकणाऱ्याला समजतो. भाषेला स्वत:ची अशी एक रचना असते. यालाच आपण 'संकेतप्रणाली' असे म्हणतो. ही संकेत प्रणालीच भाषेतील अर्थांना प्रवाही करत असते.

भाषा ही बोलण्यासाठी उपयोगात आणली जाते, तशीच ती लिखित स्वरूपातही अभिव्यक्ती करते. तिचे लेखन रूपही उपयोगात आणले जाते. भाषा, मग ती बोलण्याची असो वा लिहिण्याची, तिचे काही संकेत पाळावेच लागतात. बोलणाऱ्याचा आवाज आणि संदेश किंवा अभिव्यक्ती संप्रेषणात महत्त्वाचा घटक आहे. योग्य उच्चारांमुळे बोलण्यात स्पष्टता येते. त्याबरोबरच भावनांचे वहन करण्याकरिता उच्चारांमध्ये लवचिकता, चढ-उतार, कधी थांबणे, कधी आघात यांचीही मदत आपण घेत असतो. बोलताना आपण साधे विज्ञान, प्रश्न, उद्गार, आश्चर्य इ. व्यक्त करण्याकरिता बोलताना शब्दांमध्ये चढ-उतार, थांबणे, आघात... अशा बाबींचा वापर करतो म्हणून नेमकी भावाभिव्यक्ती होते. ऐकणाऱ्याला आशय नेमकेपणाने कळतो. बोलण्यातील या चढ-उतारांमुळे बोलण्यातील एकसुरीपणा टळतो; आशयाची नेमकी अभिव्यक्ती घडते; ऐकणाऱ्यालाही नेमका भाव टिपता येतो; साहजिकच संप्रेषण यशस्वी होते. व्यंजनांमुळे येणारी स्पष्टता व स्वरांमुळे येणारा जोर, ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार यांच्या उच्चारणांचा अर्थावर होणारा परिणाम, या बरोबरच शब्दांच्या उच्चारणास भाव सूचक आवाज दिल्यास आश्चर्य, अभिमान, तिरस्कार, निश्चय, इशारा, गांभीर्य अशा भावना ऐकणाऱ्यापर्यंत पोहोचतात. बोलण्यात सरावाने आपण नकळत निजभाषेतील या तत्त्वांचा अवलंब करत असतो.

भाषा जशी बोलण्यासाठी वापरतो तशीच ती लिहिण्यासाठीही वापरली



Scanned with OKEN Scanner

जाते. आधुनिक युगात भाषेचे लिखाण हे उपयुक्त व आवश्यक अंग बनले आहे. केवळ बोलण्यासाठीच असलेली भाषा कालांतराने नष्ट होऊ शकते. परंतु लेखनविशिष्ट भाषा दीर्घकाळ टिकते. बोलण्यातील चढ-उतार, विराम, विधान, प्रश्न, उद्गार तसेच वाचताना कोठे थांबावे? वाक्य एक संपून दुसरे केव्हा सुरू होते? आपणास प्रश्न विचारायचाय? आपण विधान केले आहे की, आश्चर्याची अभिव्यक्ती, हे कळण्यास भाषेच्या लेखन रूपात निरनिराळी चिन्हे वापरली जातात, त्यांनाच आपण 'विरामचिन्हे' असे म्हणतो. विरामचिन्हांमुळे वाक्यांचा अर्थ नेमकेपणाने कळतो; अभिव्यक्तीत स्पष्टता येते.

हा परिच्छेद वाचा -

मानवी जीवन सृष्टीतील निसर्गनिर्मित वस्तू प्राणिमात्र यांच्या सहवासात व्यतीत होत असते निसर्गनिर्मित वस्तूंच्या मुळाशी विशिष्ट अशी सहेतुकता नसते निसर्गनिर्मित पर्यावरणात जगत असताना मनुष्य आपल्या सभोवतालच्या वस्तूंची एक व्यवस्था लावत असतो ही व्यवस्था स्वत:च्या जगण्यासाठी अनुकूल प्रतिकूल ठरणाऱ्या अशा प्रकारच्या वस्तूंच्या गुणवैशिष्ट्यांवर आधारित असते. निसर्गातील सुखकारक उपयुक्त वस्तूंचा एक वर्ग तर हानिकारक निरूपयोगी कष्टदायक वस्तूंचा एक वर्ग अशी निसर्गनिर्मित वस्तूंची मनुष्य वर्गवारी करतो या वर्गांची चांगले वाईट उपयोगी निरुपयोगी सुखदायक कष्टदायक अशी गुणवैशिष्ट्ये निश्चित करतो याचा अर्थ आपल्या सभोवतालच्या वस्तूंची व्यवस्था लावणे त्यांच्यातील तरतमभाव ठरवणे ही मनुष्याची आदिम नैसर्गिक प्रवृत्ती आहे सभोवतालच्या वास्तवाचा अनुभव घेत असतानाच मानवी मनात ही प्रक्रिया घडत असते. याचा दुसरा अर्थ असा की मनुष्याची अनुभवसृष्टी पूर्णत: कोरी निर्लेप अशी नसते अनुभव घेतानाच मूल्यभाव कार्यरत होत असतो. वस्तूंमधील तरतमभाव हा मनुष्याच्या ठिकाणी असणाऱ्या मूल्यभावातूनच सक्रिय होत असतो मनुष्य आपल्या सभोवतालच्या वास्तवाची मूल्यात्मक व्यवस्था लावतो.

या लिखाणात कोठे थांबायचे; एक वाक्य संपून दुसरे केव्हा सुरू होणार? याचे कुठलेच निर्देश दर्शविले नाहीत. वाचताना आपण विरामाच्या ज्या जागा घेतो, त्याने अर्थप्राप्ती होते. वरील उताऱ्यात विरामांच्या जागा कळत नाहीत. त्यामुळे आशय समजण्यास अडथळा येतो. हाच उतारा विरामचिन्हे दिल्यानंतर पुन्हा वाचा.

मानवी जीवन, सृष्टीतील निसर्गनिर्मित वस्तू, प्राणिमात्र यांच्या सहवासात व्यतीत होत असते. निसर्गनिर्मित वस्तूंच्या मुळाशी विशिष्ट अशी सहेतुकता नसते. निसर्गनिर्मित पर्यावरणात जगत असताना मनुष्य आपल्या सभोवतालच्या वस्तूंची एक व्यवस्था लावत असतो. ही व्यवस्था स्वत:च्या जगण्यासाठी



Scanned with OKEN Scanner

अनुकूल-प्रतिकूल ठरणाऱ्या अशा प्रकारच्या वस्तूंच्या गुणवैशिष्ट्यांवर आधारित असते. निसर्गातील सुखकारक, उपयुक्त वस्तूंचा एक वर्ग; तर हानिकारक, निरुपयोगी, कष्टदायक वस्तूंचा एक वर्ग, अशी निसर्गनिर्मित वस्तूंची मनुष्य वर्गवारी करतो. या वर्गांची 'चांगले-वाईट', 'उपयोगी-निरुपयोगी', 'सुखदायक-कष्टदायक' अशी गुणवैशिष्ट्ये निश्चित करतो. याचा अर्थ आपल्या सभोवतालच्या वस्तूंची व्यवस्था लावणे, त्यांच्यातील तरतमभाव ठरवणे, ही मनुष्याची आदिम नैसर्गिक प्रवृत्ती आहे. सभोवतालच्या वास्तवाचा अनुभव घेत असतानाच मानवी मनात ही प्रक्रिया घडत असते. याचा दुसरा अर्थ असा की, मनुष्याची अनुभवसृष्टी पूर्णत: कोरी, निर्लेप अशी नसते. अनुभव घेतानाच मूल्यभाव कार्यरत होत असतो. वस्तूंमधील तरतमभाव हा मनुष्याच्या ठिकाणी असणाऱ्या मूल्यभावातूनच सक्रिय होत असतो. मनुष्य आपल्या सभोवतालच्या वास्तवाची मूल्यात्मक व्यवस्था लावतो.

विरामाने योग्य अर्थ सूचित होतो.

विरामचिन्ह दिले नसते किंवा वाचणाऱ्याने विरामांची जागा बदलली, तर अर्थात काय बदल होतो ते पाहा –

**उदाहरणार्थ –**

विधान १ : मी चोरी करणार नाही केल्यास मला फाशी द्यावी

विधान २ : मी चोरी करणार नाही; केल्यास मला फाशी द्यावी.

विधान ३ : मी चोरी करणार; नाही केल्यास मला फाशी द्यावी.

वरील उदाहरणात पहिल्या विधानात विरामचिन्हे नाहीत. दुसऱ्या विधानात विरामचिन्हे दिली आहेत, त्यानुसार वाचन करा. तिसऱ्या विधानात विरामचिन्हांची जागा बदलली तर केवळ एका विरामाने अर्थात केवढी विसंगती आली पाहा. अर्थाच्या अभिव्यक्तीत विरामचिन्हे खूप महत्त्वाचे कार्य बजावत असतात. बोलताना विराम आपण सहज वापरतो, पण लिखित भाषेत आवर्जून चिन्हे दिल्याशिवाय विरामाच्या जागा कळत नाहीत. अभिव्यक्ती नेमकी, तंतोतंत होण्यासाठी विरामचिन्हे देणे गरजेचे ठरते.

या विरामचिन्हांच्या वापराशिवाय लेखनातील वाक्यांचा अर्थबोध होणार नाही. योग्य अर्थाभिव्यक्तिसाठी मराठी भाषेने स्वीकारलेली विरामचिन्हांची व्यवस्था आता जाणून घेऊ.

विरामचिन्हे दोन प्रकारची आहेत.

१) विराम दर्शक चिन्हे

२) अर्थ दर्शक चिन्हे



Scanned with OKEN Scanner

## विरामचिन्हे व त्यांचा उपयोग

### १) विराम दर्शक चिन्हे

### १.१ स्वल्पविराम (,)

समान योग्यतेचे अनेक शब्द नामे, सर्वनामे, विशेषणे, क्रियापदे, वाक्यांश किंवा लहान-लहान वाक्य इत्यादी लागोपाठ आले असता त्यामधील पृथकपणा दर्शविण्यासाठी प्रत्येक शब्दाच्या, वाक्यांशाच्या, वाक्याच्या उच्चारानंतर बोलताना आपण थोडेसे थांबतो. ते अल्पसे थांबणे म्हणजे अल्पविराम लेखनात दर्शविण्याकरिता (,) ही खूण करतात. तिला 'स्वल्पविराम' असे म्हणतात.

बोलत असताना एखाद्याला आपण संबोधतो तेव्हाही अल्पविराम घेतो म्हणून संबोधनान्त शब्दांच्या शेवटीही 'स्वल्पविराम' येतो.

उदाहरणार्थ -

नामे : मला लाल, निळा, हिरवा, पिवळा व जांभळा हे रंग आवडतात.

सर्वनामे : तो, तू व मी मिळून हे काम पूर्णत्वास नेऊ.

विशेषणे : हुशार, अभ्यासू व खेळकर व्यक्तिमत्त्व आहे.

क्रियापदे : तो शाळेतून आला, जेवला व लगेच झोपला.

वाक्यांश : तिने अंगण झाडले, सडा टाकला व रांगोळीही रेखाटली.

वाक्य : मी खूप आनंदात होतो, मी टाळ्या पिटल्या, उड्या मारल्या आणि शीळही घातली.

संबोधन : नम्रता, नीट अभ्यास कर.
देवा, कारे असा अंत पाहतो आहेस?

### १.२ अर्धविराम (;)

ज्या ठिकाणी स्वल्पविरामापेक्षा थोडा अधिक वेळ थांबावे लागते पण बोलणे पूर्णही झालेले नसते अशा ठिकाणी (;) ही खूण करतात. त्यास 'अर्धविराम' असे म्हणतात.

स्वल्पविरामात्मक शब्दसमूह एकापुढे एक आल्यास त्या प्रत्येक समूहानंतर अर्धविराम येतो. तसेच समान योग्यतेची दोन वाक्ये एका समोर एक आल्यास दोहोंमध्ये अर्धविराम दर्शवावा. दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययाने जोडली असताना पहिल्या वाक्यानंतर आपण थोडेसे थांबतो म्हणून तेथे अर्धविराम चिन्ह देतात.

उदाहरणार्थ - काल मी येणार होतो; पण खूप पाऊस होता.



Scanned with OKEN Scanner

१.३ अपूर्णविराम (:)

बोलताना आपणास एखादी गोष्ट तपशिलाने सांगायची असल्यास आधी वाक्य उच्चारतो किंचित थांबतो आणि वाक्याच्या शेवटी तपशील देतो. हा विराम दर्शविण्यासाठी (:) हे चिन्ह दिले जाते. यास 'अपूर्णविराम' असे म्हणतात.

उदाहरणार्थ - मुख्य दिशा चार आहेत : पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर

२) अर्थदर्शक चिन्हे

**२.१ प्रश्नचिन्ह (?)**

प्रश्न विचारण्यासाठी वाक्याच्या शेवटी (?) हे चिन्ह देतात. त्यास प्रश्नचिन्ह असे म्हणतात.

उदाहरणार्थ - तुम्हास पुस्तक हवे?
तिकडे कोठे निघालात?

**२.२ उद्‌गारचिन्ह (!)**

उत्कट भावना एकदम प्रकट झाली आहे (आनंद, दु:ख, आश्चर्य आदी) हे दर्शविताना (!) हे चिन्ह देतात. त्यास 'उद्‌गारचिन्ह' असे म्हणतात.

उदाहरणार्थ - बाप रे!, आई गं!

**२.३ अवतरण चिन्ह ('...' / "...")**

महत्त्वाचे शब्द, शब्दसमूह, बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दाखवण्याकरिता तसेच एखाद्या शब्दावर जोर द्यायचा असेल तेव्हा किंवा दुसऱ्याचे मत अप्रत्यक्षपणे सांगताना ('...') किंवा ("...") हे चिन्ह वापरतात. यांना अनुक्रमे 'एकेरी अवतरण चिन्ह' व 'दुहेरी अवतरण चिन्ह' असे म्हणतात.

**(अ) एकेरी अवतरण चिन्ह ('...')**

एखाददुसराच महत्त्वाचा शब्द, शब्दसमूह, लहानसे दुसऱ्याच्या तोंडचे किंवा लेखातील वाक्य असल्यास ते एकेरी अवतरणात लिहितात.

उदाहरणार्थ - 'भाषेने व्यक्तीचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तयार होतो.'
- बेंजामिन ली वोर्फ

**(ब) दुहेरी अवतरण चिन्ह ("...")**

दुसऱ्याच्या तोंडचे बोलणे, मत किंवा व्याख्या तसेच लेखातील उतारा मोठा असल्यास तो दर्शविण्यासाठी दुहेरी अवतरण चिन्हाचा वापर केला जातो.

उदाहरणार्थ - "थांब, वही आणतो," असे म्हणून तो आत गेला.

**२.४ संयोग चिन्ह (-)**

दोन शब्द जोडताना शब्दांमधील प्रत्येक दोन पदांमध्ये ही (-) खूण करतात. यास 'संयोग चिन्ह' म्हणतात.

उदाहरणार्थ - राम-कृष्ण, आरोह-अवरोह, अधिक-उणे, चार-पाच.



Scanned with OKEN Scanner

ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास संयोग चिन्हाचा वापर करतात. पण असा शब्द तोडताना अर्थ बदलणार नाही हे पाहावे.

उदाहरणार्थ – 'गाय' वरच्या व 'कवाड' पुढच्या ओळीत असे करू नये.

उदाहरणार्थ – मराठीतील भाषामिश्रणाची काही उदाहरणे लक्षात घेतली तर भाषामिश्रणाची प्रक्रिया व त्यासाठी मागची सामाजिक मानसिकता यावर प्रकाश पडू शकेल.

**२.५ स्पष्टीकरण/अपसारण चिन्ह (–)**

एखाद्या गोष्टीचा अधिक खुलासा करायचा असेल तर किंवा बोलता बोलता विचार मालिका तुटली तर (–) या चिन्हाचा उपयोग करतात. त्यास 'स्पष्टीकरण चिन्ह' असे म्हणतात. हे चिन्ह साधारणपणे संयोग चिन्हाच्या दुपटीइतके लांब असते.

उदाहरणार्थ –
- धोब्याकडून आलेल्या चादरीसारखे – अगदी कुठेही सुरकुती न पडलेले.
- हे मी काय म्हणत होतो – आपण राधिकेस विचारू.

**२.६ कंस ( )**

अध्याहृत किंवा गौण गोष्टी व्यक्त करायच्या असतील तेव्हा ( ) या चिन्हाचा उपयोग करतात. यास 'कंस' असे म्हणतात.

उदाहरणार्थ –
- आम्ही (सर्व स्त्रिया) सावित्रीच्या लेकी आहोत.
- क्षणार्धात (म्हणजे १/२४ सेकंदात) पडद्यावरच्या एक प्रतिमेची जागा दुसरी प्रतिमा घेते.

**सरावासाठी पुढील उतारे विरामचिन्हे देऊन लिहा.**

■ उतारा १

दृष्टीचा प्रश्न यासाठी महत्त्वाचा आहे की कुठल्याही कालखंडातील कलाकृती घेतली तरी त्यातून काही ना काही दृष्टी मूल्यात्मकता ध्वनित होतेच मग ते प्राचीन साहित्य असो की अर्वाचीन बुडती हे जन न देखवे डोळा म्हणणाऱ्या कवीची एक वेगळी दृष्टी आणि मूल्यात्मकता आहे तर उदंड जाहले पाणी स्नानसंध्या करावया असे म्हणणाऱ्या कवीची एक वेगळी दृष्टी आहे दोघांच्याही मनात वेगवेगळी परस्परविरोधी अशी मूल्ये आहेत केशवसुत हरिभाऊ म फुले आगरकर यांच्या मनात जी मूल्ये आहेत ती चिपळूणकरादी मंडळींच्या मनात निश्चितच नाहीत अगदी फडक्यांचे वाङ्मय काढले तरी काही एक दृष्टी काही मूल्ये तेथे आहेत असे दिसते अर्थात या मूल्यात्मकतेवरून श्रेष्ठ कनिष्ठ ठरते का कलावंतांमध्ये परस्परविरोधी मूल्ये दिसत नाहीत का मूल्ये स्थिर असतात का या आणि असल्या प्रश्नांचे गुऱ्हाळ मलाही घालता येईल परंतु शेवटी एक अनुभव



Scanned with OKEN Scanner

दुसऱ्या अनुभवापासून वेगळा होतो किंवा तो अनुभव अस्तित्वात येतो तो तरी कशावरून शंबुकाचे दुःख वाल्मीकीला कळले की नाही माहीत नाही पण ते आजच्या दलित कवितेला निश्चितच कळले मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्राचे कौतुक करणारी पारंपरिक पुरुष संस्कृती ज्या वेळी अस्तित्वात असते त्याच वेळी अडाणी स्त्रियांच्या लोकगीतांमधून सीतेला न्याय मिळालेला असतो असे का होते तर कुठे तरी कलावंताच्या मनामध्ये त्या विशिष्ट अनुभवाला दुसऱ्या अनुभवापासून वेगळी करू पाहणारी मूल्यात्मकता असते किंबहुना मूल्यात्मकतेशिवाय कलाकृतीचे अस्तित्व संभवू शकत नाही फक्त प्रश्न निर्माण होतो तो कोणती मूल्यात्मकता स्वीकारायची हाच

■ उतारा २

गावाच्या मधोमध खोलगटीत घंटाघर लहान ताटा एवढ्या तबकडीचं एका बेतशीर मनोऱ्यावर उभं असलेलं तासातासाला टोले देणारं म्हणून हे घंटाघर घंटाघराच्या सभोवताली सोनाराकासारांची भांड्याकुंड्यांची कापडचोपडाची औषधांची दुकानं घंटाघराच्या बाजूला महेश्वरी ठाकुरांची सोन्याचांदीची दिमाखदार पेढी घंटाघराच्या पाठीमागे मुलींची श्रीमंत राधाबाईसाहेब कन्याशाळा कन्याशाळेशेजारीच चावडी घंटाघराला वळसा घालून मुख्य रस्त्यावर कोपऱ्याशी सरदार देशमुखांचा वाडा वाड्यासमोर धनिकांची बैठी चुनेगच्च्यांची घरं मधूनच एखादं जैन मंदिर मधूनच एखादी मशीद मात्र रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी अधूनमधून राम मंदिर दत्त मंदिर गणपती मंदिर दत्त मंदिराच्या उजव्या वळणावर सरदार आपट्यांचा वाडा डाव्या वळणावर भाऊसाब महाराजांची कोठी आणि कोठीसमोर कोतवाली रस्त्याच्या दोन्ही अंगांना बसकी घरं कासारांची शिंप्यांची मिठायांची दुकानं कोणी कुठे घर बांधावं किंवा दुकान उघडावं ह्याला काही नियम नव्हते

**विरामचिन्हासह उतारे वाचा.**

■ उतारा १

दृष्टीचा प्रश्न यासाठी महत्त्वाचा आहे की कुठल्याही कालखंडातील कलाकृती घेतली तरी त्यातून काही ना काही दृष्टी–मूल्यात्मकता ध्वनित होतेच. मग ते प्राचीन साहित्य असो की अर्वाचीन. 'बुडती हे जन न देखवे डोळा' म्हणणाऱ्या कवीची एक वेगळी दृष्टी आणि मूल्यात्मकता आहे, तर 'उदंड जाहले पाणी : स्नानसंध्या करावया' असे म्हणणाऱ्या कवीची एक वेगळी दृष्टी आहे. दोघांच्याही मनात वेगवेगळी–परस्परविरोधी अशी मूल्ये आहेत. केशवसुत, हरिभाऊ, म. फुले, आगरकर यांच्या मनात जी मूल्ये आहेत, ती चिपळूणकरादी मंडळींच्या मनात निश्चितच नाहीत. अगदी फडक्यांचे वाङ्मय काढले तरी काही एक दृष्टी, काही मूल्ये तेथे आहेत असे दिसते. अर्थात या मूल्यात्मकतेवरून श्रेष्ठ–कनिष्ठ



Scanned with OKEN Scanner

ठरते का? कलावंतांमध्ये परस्परविरोधी मूल्ये दिसत नाहीत का? मूल्ये स्थिर असतात का? या आणि असल्या प्रश्नांचे गुऱ्हाळ मलाही घालता येईल. परंतु शेवटी एक अनुभव दुसऱ्या अनुभवापासून वेगळा होतो किंवा तो अनुभव अस्तित्वात येतो तो तरी कशावरून? शंबुकाचे दु:ख वाल्मीकीला कळले की नाही, माहीत नाही पण ते आजच्या दलित कवितेला निश्चितच कळले. 'मर्यादा पुरुषोत्तम प्रभू' रामचंद्रांचे कौतुक करणारी पारंपरिक पुरुष संस्कृती ज्या वेळी अस्तित्वात असते, त्याच वेळी अडाणी स्त्रियांच्या लोकगीतांमधून सीतेला न्याय मिळालेला असतो. असे का होते? तर कुठे तरी कलावंताच्या मनामध्ये त्या विशिष्ट अनुभवाला दुसऱ्या अनुभवापासून वेगळी करू पाहणारी मूल्यात्मकता असते. किंबहुना मूल्यात्मकतेशिवाय कलाकृतीचे अस्तित्व संभवू शकत नाही. फक्त प्रश्न निर्माण होतो तो, कोणती मूल्यात्मकता स्वीकारायची हाच.

■ उतारा २

गावाच्या मधोमध, खोलगटीत घंटाघर. लहान ताटा एवढ्या तबकडीचं, एका बेतशीर मनोऱ्यावर उभं असलेलं, तासातासाला टोले देणारं, म्हणून हे घंटाघर. घंटाघराच्या सभोवताली सोनारा-कासारांची, भांड्या-कुंड्यांची, कापड-चोपडाची, औषधांची दुकानं. घंटाघराच्या बाजूला महेश्वरी ठाकुरांची सोन्याचांदीची दिमाखदार पेढी. घंटाघराच्या पाठीमागे मुलींची श्रीमंत राधाबाईसाहेब कन्याशाळा. कन्याशाळेशेजारीच चावडी. घंटाघराला वळसा घालून मुख्य रस्त्यावर कोपऱ्याशी सरदार देशमुखांचा वाडा. वाड्यासमोर धनिकांची बैठी चुनेगच्च्यांची घरं, मधूनच एखादं जैन मंदिर... मधूनच एखादी मशीद... मात्र रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी अधूनमधून राम मंदिर, दत्त मंदिर... गणपती मंदिर. दत्त मंदिराच्या उजव्या वळणावर सरदार आपट्यांचा वाडा, डाव्या वळणावर भाऊसाब महाराजांची कोठी, आणि कोठीसमोर कोतवाली. रस्त्याच्या दोन्ही अंगांना बसकी घरं, कासारांची, शिंप्यांची; मिठायांची दुकानं... कोणी कुठे घर बांधावं किंवा दुकान उघडावं ह्याला काही नियम नव्हते.



Scanned with OKEN Scanner

२

# अलंकार

सामाजिक, सांस्कृतिक व्यवहाराच्या गरजा भागविण्यासाठी आपण भाषेचा अवलंब करीत असतो. त्या दृष्टीने भाषा अधिक प्रभावी कशी होईल याचाही प्रयत्न आपण करीत असतो. यासाठी समर्पक शब्दांचा वापर, बोलत असू तेव्हा उच्चारण, लेखनात विरामचिन्हे याबरोबरच भाषेचा वापर कलात्मक ढंगाने करण्याचा प्रयत्नही आपण करीत असतो. भाषा अधिकाधिक परिणामकारक, आकर्षक, चांगली दिसावी म्हणून आपण साध्या बोलण्यालाच वेगळी रचना करून मांडणी करीत असतो.

उदाहरणार्थ –

मानवी जीवनात सुख-दु:खे येतातच. किंबहुना सुखापेक्षा दु:खच अधिक असेल हे सांगण्यास वेगवेगळ्या रचना झालेल्या दिसून येतात.

*''सुख पाहता जवापाडे*
*दु:ख पर्वता एवढे''*

किंवा

*''एक धागा सुखाचा, शंभर धागे दु:खाचे*
*जरतारी हे वस्त्र मानवा, तुझिया आयुष्याचे''*

भाषेच्या अशा चमत्कृतीपूर्ण वापराने साधी कल्पना मोहक रूप घेते. कल्पना प्रभावी, आकर्षक रीतीने मांडली जाते. भाषेला शोभा आणणाऱ्या या गुणधर्मांनाच भाषेचे 'अलंकार' असे म्हणतात. दागिने घातल्यावर मानवी शरीर जसे सुशोभित होते. तद्वतच अलंकारांनी भाषेचे सौंदर्य खुलते. कधी वस्तुतील साम्य दर्शवून तर कधी विरोध दाखवून, कधी नाद किंवा लय साधून तर कधी अतिशयोक्तीने भाषेचा वापर करून भाषा प्रभावी करता येते. भाषेच्या अलंकरण्यात कधी शब्दांचे सामर्थ्य लाभते तर कधी अर्थछटा मोहक रूप घेते. यावरून भाषेच्या अलंकारांचे दोन प्रकार होतात.

१) शब्दालंकार
२) अर्थालंकार



Scanned with OKEN Scanner

### (१) शब्दालंकार

शब्दालंकारांची मुख्य तीन रूपे आहेत. १) अनुप्रास २) यमक ३) श्लेष

#### १) अनुप्रास

एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात अथवा पदात पूर्वी उच्चारलेला वर्ण कानात गुणगुणत आहे तोच पुन्हा त्याची आवृत्ती करणे याला अनुप्रास म्हणतात. वर्ण पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे त्याला सौंदर्य प्राप्त होते.

उदाहरणार्थ –

- *''हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरीं*
  *मठाची उठाठेव कां तरी''*
- *''आज गोकुळात रंग खेळतो हरी।*
  *राधिके जरा जपून जा तुझ्या घरी।।''*

#### (२) यमक

दोन किंवा अधिक चरणांच्या शेवटी काही अक्षरांची पुनरावृत्ती होते यास यमक अलंकार म्हणतात.

उदाहरणार्थ –

*''पोटा पुरता पसा पाहिजे नको पिकाया पोळी*
*देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी''*

अनुप्रासात जशी अक्षरांची पुरावृत्ती असते, तशी यमकातही असते. यातील चरणांच्या शेवटी, मध्ये किंवा ठरावीक ठिकाणी पुनरावृत्ती होत असते. अक्षरांची पुनरावृत्ती कोणत्या ठिकाणी होते, यावरून यमकाचे आदि यमक, मध्य यमक, आश्वघाटी यमक, दाम यमक, पुष्प यमक, समुद्गक यमक असे आणखी प्रकार आहेत.

**२.१ आदि यमक**

श्लोक किंवा आर्यांच्या रचनेत प्रारंभीची काही अक्षरे सारखी घेऊन आदियमक साधले जाते.

उदाहरणार्थ –

*''हार विला सवतीने केला हा लक्ष्मण प्रसूने कीं*
*हारविला सवतीने क्षितिने पुजिला सुरप्रसूने की''*

**२.२ मध्य यमक**

चरणातील मध्य अक्षरांनी साधले जाते ते मध्य यमक होय.

उदाहरणार्थ –

*''सेवूनि संतत पाला, संत तपाला यदर्थ करितात.''*



Scanned with OKEN Scanner

२.३ आश्वघाटी यमक

चरणांच्या आरंभापासून शेवटपर्यंत काही अक्षरे विशिष्ट लयीत सारखी येतात.

उदाहरणार्थ -

*"वाजत गाजत साजत आज तया जतन करुनि आणा हो।"*

२.४ दाम यमक

पहिल्या चरणाच्या शेवटी दुसऱ्या चरणाच्या प्रारंभी आणि त्याच चरणाच्या शेवटी अशा प्रमाणे यमक जुळणी होते यास दाम यमक म्हणतात.

उदाहरणार्थ -

*"मान्य कसा न मला हो गोरा जरि होय हीन कुंभार।*
*भार ज्याचा प्रभुवर वंद्य मला रोहिदास चांभार।।"*

२.५ पुष्प यमक

प्रत्येक चरणाच्या शेवटी काही अक्षरे समान येऊन पुष्प यमक साधले जाते.

उदाहरणार्थ -

*"सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो।*
*कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो।।"*

२.६ समुद्‌गक यमक

आर्या किंवा श्लोकांची दोन्ही अर्धे सारख्याच अक्षरांची पण पदच्छेद मात्र वेगळा यास समुद्‌गक यमक असे म्हणतात.

उदाहरणार्थ -

*"अनळसमीहीत साधी राया! वारा महीवर! कामा।*
*अनळस मीहि तसा धीर! यावा रामही बराका मा।।*
*पायानमी देइन वंश सारा। पाया न`मी दे इनवंशसारा"*

(३) श्लेष

एकच शब्द पदांत मागे-पुढे असलेल्या शब्दांशी जोडून त्याचे अर्थ बदलतात. शब्द चमत्कृती साधते, त्यास श्लेष अलंकार असे म्हणतात.

उदाहरणार्थ -

*"ते शीतळोपचारी जागी झाली हळूच मग बोले*
*औषध नलगे मजला परिसुनि जननी 'बरे' म्हणूनि डोले"*



Scanned with OKEN Scanner